मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पवना, इंद्रायणी नदी प्रदूषित करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा!

## पर्यावरण प्रेमींचे थेट पंतप्रधानांना पत्र

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरातून वाहणा-या पवना आणि इंद्रायणी नदीत मैलामिश्रित, रसायनयुक्त पाणी थेटपणे सोडले जाते. त्यामुळे दोन्ही नद्यांची दुरवस्था झाली असून पाण्यावर तवंग येत आहेत. याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत नदी प्रदूषणाला जबाबदार असणा-यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तळवडेपासून च-होलीपर्यंत इंद्रायणी नदीचे प्रदूषण वाढले आहे. तर, किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. मागील पावसाळ्यात पवना



> **“पवना, इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबत सातत्याने आवाज उठवत आहोत. परंतु, महापालिका प्रशासन नदीच्या प्रदूषणाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे नदी प्रदूषणाला जबाबदार असणा-यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी पंतप्रधानांकडे पत्राद्वारे केली आहे.**
> **-प्रशांत राऊळ, पर्यावरणप्रेमी**

नदीतील पाण्यावर पाचवेळा तवंग आले. थेरगावातील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग येत आहेत. जलचर प्राणी मृत पडत आहेत. पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे. मागील आठवड्यात इंद्रायणी नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग आले होते.

# ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या नशिबी घोर निराशा!

## प्रयत्नांची पराकाष्ठा...हेलपाट्यांवर हेलपाटे

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**
गेल्या साडेसहा वर्षांपासून भोसरी एमआयडीसी भागातील बालाजीनगर झोपडपट्टीमधील पात्र लाभार्थ्यांना राज्य सरकारच्या रमाई आवास (घरकुल) योजनेचे अनुदान देण्यास महापालिकेतील अधिकारी काही ना काही कारणे सांगून टाळाटाळ करत आहेत. आमच्या नशिबी हा संघर्ष आणखी किती काळ राहणार ? असा प्रश्न लाभार्थी विचारू लागले आहेत. त्यामुळे, चळवळीतील कार्यकर्त्यांनी अखेर बेमुदत उपोषणाचे अस्त्र उगारले आहे. सर्व हारा उत्कर्ष चिंतन समाज सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बी.बी.शिंदे यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी वरील प्रश्नाबाबत महापालिका, एमआयडीसी, समाज कल्याण विभाग व नगर विकास विभाग यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. परंतु; महापालिका प्रशासन याबाबत साफ टाळाटाळ करत आहे, असा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. सर्व हारा उत्कर्ष चिंतन समाज सामाजिक संघटनेच्या माध्यमातून प्रा.शिंदे यांनी पाठपुरावा करुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अव्वर सचिव अ.कों.आहिरे यांनी नऊ मार्च २०२३ ला नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्याची विनंती करणारे पत्र दिले होते. तत्पूर्वी 'सकाळ'ने याबाबत १३ नोव्हेंबर २०२२ ला 'रमाई योजना राबविण्यास टाळाटाळ' असे सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने आदेश काढल्यानंतरही 'सकाळ'ने 'रमाई आवास योजनेचा लाभ देण्याचे आदेश' असे वृत्त १६ मार्च २०२३ ला दिले. बैठकीत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिकेला असे आदेश अथवा सूचनांचे पत्र न मिळाल्याचे लक्षात आणून दिले. त्यानंतर, प्रा. शिंदे यांनी पुन्हा नगर विकास विभागात हेलपाटे मारुन संबंधित अधिकाऱ्यांना ही योजना गोरगरिबांसाठी कशी उपयुक्त असून या योजनेचे गांभीर्य सांगितले. त्यानंतर, नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी शिवाजी चव्हाण यांनी सामाजिक न्याय विभागाच्या पत्राची दखल घेऊन याप्रकरणी बालाजीनगर येथील लाभार्थ्यांना नियमांनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती करणारे पत्र १९ एप्रिल २०२३ ला महापालिका आयुक्त सिंह यांना दिले. त्यानंतर, महापालिकेने शासनाच्या नियमानुसार असा उल्लेख पत्रात हवा, अशी त्रुटी काढली.

# शेतकऱ्यांचा प्रश्न मिटला नाही तर मंत्रालयावर मोर्चा!

## चाकण - शिक्रापूर राज्यमार्गावर रास्ता रोको

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** चाकण - शिक्रापूर राज्यमहामार्गावर खेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी सुमारे तासभर रास्ता रोको आंदोलन केले. 'जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची', 'लढा ना राजकारणासाठी ना स्वार्थासाठी, लढा आमच्या हक्कासाठी', 'पाणी नाही तर जमीन नाही', 'सरकारचे धोरण शेतकऱ्यांचे मरण', 'सरकारची दिवाळी मात्र शेतकऱ्यांचा शिमगा' अशा विविध घोषणा देत शेतकऱ्यांनी शासनाविरोधात आपला रोष व्यक्त केला. दरम्यान रस्त्यावर वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या. तर आंदोलनस्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



खेड तालुक्यातील चासकमान, भामा आसखेड धरण अंतर्गत खेड तालुक्यातील काळूस भागातील २५ पेक्षा अधिक गावातील शेतजमिनीवर ४० वर्षापासून पुनर्वसनाचे शिक्के टाकले आहेत. प्रत्यक्षात कालव्याद्वारे येणारे पाणी या भागाला येत नाही. कालवे रद्द झाले आहे. लाभ क्षेत्रात ही गावे येत नसताना अन्यायकारक पद्धतीने हे शिक्के तसेच ठेवले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना जमीन विकणे, कर्ज काढणे, जमिनीचे कुटुंबातवाटप करणे, दलालान मार्फत जमिनी गिळंकृत करण्याचा प्रयत्न करणे यासारख्या अनेक प्रश्नांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.

यापार्श्वभूमीवर काळूस येथे मागील काही दिवसांपासून साखळी उपोषणाद्वारे आंदोलनही सुरू आहे. मात्र शासन आपल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करत नसल्याने माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली भोसे येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले. शेतकऱ्यांनी बैलगाड्या व जनावरे घेऊन रस्त्यावर तासभर ठिय्या मांडला. आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्य रयत क्रांती युवा आघाडीचे अध्यक्ष सागर खोत, महाराष्ट्र राज्य रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दीपक भोसले, माजी उपसभापती ज्योती आरगडे, मनोहर वाडेकर, डॉ. बाळासाहेब माशेरे, सुभाषराव पोटवडे, नवनाथ आरगडे, बाजीराव लोखंडे, मोहन पवळे यांनी मनोगते व्यक्त करून तीव्र भावना व्यक्त केल्या. शेतकऱ्यांचा प्रश्न मिटला नाही तर मंत्रालयाला घेराव घालण्याचे आंदोलन करण्यात येईल.

# बांधकामे बंद ठेवताना प्रथम मजुरांची सोय लावा!

## स्थायी समितीच्या माजी अध्यक्ष सिमा सावळे यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदुषण कमी करण्यासाठी पुढचे आठवडाभर म्हणजे १९ नोव्हेंबर पर्यंत सर्व बांधकामे बंद ठेवण्याचे लेखी आदेश महापालिका प्रशासनाने काढल्याने बांधकाम क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, प्रशासनाच्या या आदेशामुळे हातावर पोट असणाऱ्या हजारो बांधकाम मजुरांची मोठी उपासमार होणार असून या कष्टकऱ्यांची दिवाळी कडू झाली आहे.

सर्व बांधकाम मजुरांना दोन वेळचे जेवण, नाष्टा आणि आठवड्याची मजुरी देण्याची सोय बांधकाम व्यावसायिकांची संघटना असलेल्या क्रेडाई मार्फत महापालिका प्रशासनाने करावी, अशी लेखी मागणी स्थायी समितीच्या माजी अध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड बांधकाम मजूर व असंघटीत कामगार संघाच्या सरचिटणीस सिमा सावळे यांनी केली आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात सावळे म्हणतात, वाहनांचा धूर, बांधकाम साईट्स तसेचफटाक्यांमुळे शहरातील हवा प्रदुषित झाली हे मान्य आहे. प्रामुख्याने भोसरी सर्वाधिक प्रदुषित झाली आहे, तर त्या खालोखालवाकडमधील भूमकर चौक, निगडी या भागातील हवेची गुणवत्ता सर्वात खराब श्रेणीत नोंदली गेली.

उपाय म्हणून महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व बांधकामे आठ दिवसांसाठी म्हणजे १९ नोव्हेंबर पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय केला. प्रत्यक्षात या निर्णयाचा सर्वात मोठा फटका शहरातील विविध बांधकाम साईट्सव्र काम करणाऱ्या गोरगरिब मजुरांना बसणार



आहे. हातावर पोट अणाऱ्या या घटकाचा रोजगार बुडणार आहे. रोजच्या रोज काम केले तरच पगार मिळतो, अशी परिस्थिती असल्याने या कष्टकऱ्यांना आठवडाभर काम नसेल तर पगार मिळणार नाही. महापालिका प्रशासनाने याचा कुठेतरी गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. प्रदुषण पातळी कमी झाली पाहिजे यात दुमत नाही, पण गरिबाच्या पोटावर पाय देऊन निष्ठुरपणे असे निर्णय करणार असाल तर ते दुर्दैवी म्हणावे लागतील. राज्य सरकारकडे बांधकाम कामगार कल्याण निधी आहे. कोरोना काळात सर्व बांधकामे बंद असताना या मजुरांना त्यातून मोठी मदत करण्यात आली होती. दोन वेळच्या भोजनाची सोयसुध्दा झाली होती. आतासुध्दा महापालिका प्रशासनाने त्याच पध्दतीने या बांधकाम मजुरांच्या पोटापाण्याचा आणि मजुरीचा विचार केला पाहिजे. बांधकाम मालकांची संघटना असलेल्या क्रेडाईची सुध्दा या कामात मोठी मदत मिळू शकते. आयुक्तांनी या मागणीचा ताबडतोब विचार करून आठवड्याची मजुरी तसेच दोन वळचे जेवण व नाष्टा अशी सोय करून द्यावी. शहरातील हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हिवाळ्यात जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. त्यात फटाक्यांची भर पडत आहे. त्यामुळे शहरातील हवा अतिवाईट श्रेणीत गेली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने ३२ प्रभागांमध्ये १६ वायू प्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकांद्वारे प्रभागातील बांधकाम स्थळांना भेटी देऊन छायाचित्रे, चित्रफितीद्वारे त्याची नोंद घेण्यात येत आहे. या दरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. दैनंदिन वायू प्रदूषण निरीक्षण केले जाते. शहरातील हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी उद्योगांच्या वायू प्रदूषणावरही बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या (आयआयटीएम) सफर या संकेतस्थळाच्या माध्यमातून प्रदूषणाच्या नोंद घेतल्या आहेत. अतिसूक्ष्म धूलिकण (पीएम २.५) आणि सूक्ष्म धूलिकणात (पीएम १०) वाढ झाल्याने शहराच्या काही भागातील हवेची गुणवत्ता खराब श्रेणीपर्यंत पोहोचली होती. सफर या संकेतस्थळाच्या नोंदीनुसार भोसरी, वाकडमधील भूमकर चौक, निगडी या भागातील हवेची गुणवत्ता सर्वांत खराब श्रेणीत नोंदली गेली आहे. वाढलेल्या प्रदूषणामुळे शहरातील हवेची गुणवत्ता ढासळल्याने पर्यावरण विभागाने शहरातील सर्व बांधकामे आठ दिवस बंद ठेवण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्याला आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली असून १९ नोव्हेंबर पर्यंत सर्व बांधकामे बंद राहणार आहेत.

# मनोज जरांगेंची तोफ पुन्हा धडाडली!

## मनोज जरांगेचा छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला




**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आरक्षणाचा लढा ७० टक्के जिंकत आला आहे. काही झालं तरी हा लढा जिंकायचा आहे. नोंदी मिळाल्या आहेत. त्या नोंदींचा अहवाल पारित होणार आहे. तो अहवाल स्वीकारत २४ डिसेंबरला सरकार कायदा पारित करून महाराष्ट्रातील मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण जाहीर करणार आहे. त्याशिवाय सरकारची सुट्टी नाही, असे जरांगे म्हणाले आहेत. ते पुढे म्हणाले की, २४ डिसेंबरपर्यंत सरकारने आरक्षण दिले नाही तर २५ डिसेंबरला समाजाची बैठक घेऊन पुढील दिशा जाहीर करू. मात्र याबाबत जो काही निर्णय होईल तो शांततेत होईल. मात्र सरकारला तो निर्णय खूप जड जाईल, असेही जरांगे म्हणाले. मराठा आरक्षणासंदर्भात दौंड तालुक्यातील वरवंड येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जरांगे पाटील बोलत होते. मराठा आरक्षणाला विरोध करणारे वाढणार आहेत. मतभेद होऊ देऊ नका. सरकार आणि समाजातीलच काही लोक स्वार्थासाठी समाजाच्या विरोधात भूमिका घेऊ शकतात. कारण सरकारकडे पर्याय राहिला नसल्याचे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केले. जरांगे पाटील म्हणाले की, आपल्या समाजातील कार्यकर्त्यांना पुढे घालून मराठा आरक्षणाला विरोध करायला लावायचा. हा एकमेव पर्याय सरकारकडे उरला आहे. त्यांना पत्रकार परिषदा घ्यायला लावायच्या त्यांना आरक्षण नको म्हणायला लावायचं, अशी भूमिका मांडायला लावू शकतात. त्यामुळे त्यांच्या हातापाया पडून सांगा की, तुम्हाला घ्यायचं असेल तर घ्या. हातातोंडाला आलेल्या आरक्षणाच्या घासात विष कालवण्याचे काम करू नका, असा इशारा ही जरांगे यांनी दिला. विजयाचा क्षण जवळ आला आहे. आपल्यात मतभेद होऊ देऊ नका. कोणता नेता जर मतभेद करत असेल तर त्याच्याकडे बारकाईने लक्ष ठेवा. मराठ्यांच्या विरोधात जाणाऱ्याला कधीच माफ करायचं नाही, असेही जरांगे म्हणाले. दरम्यान जरांगे पाटील बोलत असताना माइकमधून डबल आवाज येत असताना तो बंद करा असे म्हणत माणसं इकडं ते बोलतोय तिकडं आरक्षणाचं ही असंच झालं. आमचं आरक्षण इथं आणि आम्हाला हिंडायला लावलं ५०% च्या वर त्यातच पन्नास पिढ्या गेल्या. घेणं नाही देणं नाही. घे ५० टक्केच्या वर तू घे ना आम्हाला कशाला देतो. तू खातो आतलं. आमचं खातो तुझं खातो. तू ओबीसीचं खातो ओपनमध्ये येतो. ईडब्ल्यूएसमध्ये येतो. खातो तरी किती. तुला साऱ्या दुनियाचं पुरेना. तरीही म्हणतो आमच्यात येऊ नको, असे म्हणत जरांगे पाटील यांनी नाव न घेता मंत्री छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला चढविला.

### विरोध करणारे वाढणार आहेत

» २४ डिसेंबरपर्यंत सरकारने आरक्षण दिले नाही तर २५ डिसेंबरला समाजाची बैठक घेऊन पुढील दिशा जाहीर करू. मात्र याबाबत जो काही निर्णय होईल तो शांततेत होईल. मात्र सरकारला तो निर्णय खूप जड जाईल, असेही जरांगे म्हणाले. मराठा आरक्षणासंदर्भात दौंड तालुक्यातील वरवंड येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जरांगे पाटील बोलत होते. मराठा आरक्षणाला विरोध करणारे वाढणार आहेत. मतभेद होऊ देऊ नका. सरकार आणि समाजातीलच काही लोक स्वार्थासाठी समाजाच्या विरोधात भूमिका घेऊ शकतात. कारण सरकारकडे पर्याय राहिला नसल्याचे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केले.

# निवडणूक आयोग भाजपच्या खिशात!

## शाहांवर कारवाई करण्याची वडेट्टीवारांची मागणी



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्य सरकारमध्ये थोडीशी लाज लज्जा असेल तर अधिवेशनापूर्वी केलेल्या घोषणांची पूर्तता करून शेतकऱ्यांना निधी उपलब्ध करून द्यावा असा इशारा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी नागपुरात बोलताना दिला. कर्ज वेळेत भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये देण्यात येणार होते. मात्र, अद्याप ते पैसे मिळालेले नाही. टंचाईबाबत आम्ही सरकारच्या निदर्शनास परिस्थिती आणून दिल्याने तालुक्यांची आणि मंडळांची संख्या वाढवली. मदत जाहीर झाली पण ती मदत अद्याप मिळाली नाही, हे ही आम्ही सरकारच्या निदर्शनास आणून दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आम्ही आगामी अधिवेशनात सरकारला धारेवर धरु असे वडेट्टीवार म्हणाले. सरकारकडून पोकळ हमीभावाची घोषणा केली जाते पण सध्या कापसाचे आणि सोयाबीने दर पडलेले आहेत. २०१३ मध्ये ११ हजार रुपयांना कापूस विकला जात होता मात्र, सध्या दोनपट भाव देण्याची घोषणा करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली जात असल्याचा आरोप विरोधीपक्षनेते वडेट्टीवारांनी केला. धान कापणी सुरू झाल्यानंतर सरकार काही घोषणा करणार का आणि शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ७०० रुपये बोनस देण्याची मागणी करणार का? असा सवाल त्यांनी केला. स्थानिक पातळीवर इंडिया आघाडीच्या जागा वाटपात कोणताही अडथळा येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांना नोटीस पाठविल्यावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीका केली. निवडणूक आयोग भाजपच्या खिशात आहे असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. वास्तविक, निवडणूक आयोग भाजपचे झाले आहे अशा शब्दात वडेट्टीवार यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. राम मंदिरात मोफत दर्शनाच्या नावाने मत मागणाऱ्यांना नोटीस का देत नाही? असा सवालही वडेट्टीवार यांनी केला आहे. धार्मिक भावनेतून मते मागणे हे संविधानात आहे काय का आचारसंहितेत आहे? असा सवाल त्यांनी निवडणूक आयोगाला केला. कारवाई करायची असेल तर देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्यावर कारवाई केली पाहिजे. त्यांना नोटीस देण्यात आली पाहिजे. भीतीपोटी हा प्रकार घडल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार म्हणाले की, देशाच्या राजकारणात विष पसरवणाऱ्यांना उखडून काढण्याचा इंडिया आघाडीचा निर्णय आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

### जागा वाटपात अडथळा येणार नाही

» सरकार काही घोषणा करणार का आणि शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ७०० रुपये बोनस देण्याची मागणी करणार का? असा सवाल त्यांनी केला. स्थानिक पातळीवर इंडिया आघाडीच्या जागा वाटपात कोणताही अडथळा येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांना नोटीस पाठविल्यावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीका केली. निवडणूक आयोग भाजपच्या खिशात आहे असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. वास्तविक, निवडणूक आयोग भाजपचे झाले आहे अशा शब्दात वडेट्टीवार यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत.

# राजकीय मतभेदांनंतरही दिवाळीला एकत्र येण्याची पवार कुटुंबीयांची परंपरा कायम!

## सुप्रिया सुळे भाऊबीजेसाठी अजित पवारांच्या काटेवाडीतील घरी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर पवार कुटुंब एकत्र येऊन दीपावलीचा सण साजरा करणार का, याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. पाडव्याला गोविंदबागेत माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना भेटण्यासाठी असंख्य कार्यकर्ते आले असताना, दिवसभरात न फिरकलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रात्री उशिरा गोविंदबागेत हजेरी लावली. त्यानंतर भाऊबीज साजरी करण्यासाठी शरद पवार यांच्यासह सुप्रिया सुळे आणि प्रतिभा पवार हे अजित पवारांच्या काटेवाडीतील घरी गेल्याने दिवाळीला एकत्र येण्याची



पवार कुटुंबाची परंपरा कायम राहिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर हा पहिलाच दिवाळीचा सण होता. त्यामुळे शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार का, याबाबत चर्चा सुरू होती. मात्र, दिवाळीला राजकीय मतभेद विसरून कौटुंबिक सोहळ्यासाठी शरद पवार आणि अजित पवार एकत्र आल्याचे चित्र पहायला मिळाले. पाडव्याला गोविंदबागेत शरद पवारांना भेटण्यासाठी असंख्य कार्यकर्ते आले होते. मात्र, अजित पवार यांची दिवसभर अनुपस्थिती होती. मंगळवारी रात्री पावणेआठच्या सुमारास अजित पवार हे गोविंदबागेमध्ये गेले. त्यानंतर भाऊबीजेला पवार कुटुंब हे अजित पवारांच्या काटेवाडीतील निवासस्थानी एकत्र जमले. सुप्रिया सुळे आणि प्रतिभा पवार या अजित पवारांच्या घरी गेल्या. त्यानंतर शरद पवारही अजित पवारांच्या घरी पोहोचले. त्यामुळे राजकीय मतभेद असले तरी दिवाळीनिमित्त कौटुंबिक आनंद साजरा करण्यासाठी एकत्र येण्याची पवार कुटुंबाची परंपरा कायम राहिली आहे. शरद पवार यांचे जात प्रमाणपत्र समाजमाध्यमावर प्रसारित होत आहे. याबाबत पवार म्हणाले. 'माझी जात कोणती आहे, हे सर्वांना माहीत आहे. जन्माने मिळालेली जात लपू शकत नाही. माझ्या जातीचा उल्लेख असलेला शाळेचा दाखला समाजमाध्यमावर प्रसारित होत आहे, तो खरा आहे. मी मराठा एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये होतो. त्या शाळेचा दाखला असून, त्यावरील जात, धर्माचा केलेला उल्लेख खरा आहे. मात्र, काही लोकांनी इंग्रजीतील माझ्या जातीपुढे ओबीसी लिहून दुसरा दाखला समाजमाध्यमांवर प्रसारित केला आहे. मला ओबीसी वर्गाबद्दल आदर आणि आस्था आहे. जात-धर्म या विषयांवर मी कधी समाजकारण आणि राजकारण केले नाही'

# दगडूशेठ गणपतीला ११०० नारळांचा नैवेद्य!

## ट्रस्टतर्फे मंदिरात श्री उमांगमलज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गाणपत्य संप्रदायात कार्तिक शुद्ध चतुर्थी, श्री उमांगमलज जन्मोत्सवात मोरयाला नारळ समर्पित करण्याला विशेष महत्त्व आहे. हे औचित्य साधून श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात हा जन्मोत्सव सोहळा साजरा करीत गंरायल्स ११०० नारळांचा नैवेद्य गुरुवारी दाखविण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे मंदिरात श्री उमांगमलज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



गुरुवारी पहाटे तीन वाजता ब्रह्मणस्पती सूक्त, पहाटे चार वाजता गायिका सन्मिता धापटे-शिंदे यांच्या गायनाचा कार्यक्रम आणि सकाळी आठ वाजता गणेश याग झाला. ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण म्हणाले, देवी पार्वतीने अंगावरच्या मळापासून एक पुतळा बनवला. त्याला जिवंत केले. पुढे त्याचे आणि शंकरांचे युद्ध झाले. भगवान शंकरांनी त्या मुलाचे मस्तक उडविले. देवी पार्वतीच्या संतापाला शांत करण्यासाठी शेवटी त्या बालकाच्या धडावर भगवान श्री विष्णूंनी आणलेले गज मस्तक बसविण्यात आले. त्यांना श्री गजानन असे म्हटले आहे. ही गणेश जन्माची कथा आपण नेहमी ऐकतो ती या अवताराची कथा आहे. या अवतारात भगवान श्री गणेशांचे नाव उमांगमलज आहे.